# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३१५/२०१९ दिनांक ११/०७/२०१९**

## आसना नदीच्या परीसरातील जाणा-यांना लूबाडणारे चोरटे स्थानिक गून्हे शाखेकडून अटक

दि. २२.०६.२०१९ रोजी १८.०० वा. आसना नदीच्या पूलाजवळ, गूरूव्दार ते दशमेश पेट्रोल पंपाचे दरम्यान अर्धापूर रोड, पिंपळगाव शिवारात यातील फिर्यादी नामे गणेश प्रेमराज देशमूख रा. पिंपळगाव ता. अर्धापूर हे त्यांचे पॅशन प्रो मोटारवरून त्यांच्या बहीणीला घेऊन गावाकडे जात असताना, स्पेलंडर गाडीवर आलेल्या तीन अनोळखी चोरटयांनी त्यांना आडवून त्यांचेजवळील विवा कंपनीचा मोबाईल हॅंडसेट बळजबरीने हिसकावून नेला होता. सदर प्रकरणी पो. स्टे. अर्धापूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द गूरनं १६१/१९ कलम ३९२, ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मागील दोन ते तीन महीन्यामध्ये आसना नदीच्या आजूबाजच्या परीसरात मोटार सायकल जाणा-या येणा-या वाटसरूंना एकटे गाठून लूटल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने त्या परीसरात असे गून्हे करणा-या चोरटयांचा मा. पोलीस अधीक्षक साहेब नांदेड, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांचेकडून तपास सूरू असताना, आज दि. ११.०७.२०१९ रोजी स्थानिक गून्हे शाखा नांदेड येथे गूप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहीती मिळाली की, अंदाजे पंधरा दिवसांपूर्वी गूरूव्दार ते दशमेश पेट्रोल पंपाचे दरम्यान आसना पूलाजवळ अर्धापूर रोड पिंपळगाव शिवारात सैय्यद आसीम, राहूल कूरील दोन्ही रा. रज्जानगर नांदेड व मोहमद मूददसीर रा. मोमीनपूरा नांदेड यांनी मिळून एका मोटार सायकलवरून जाणा-या जोडप्याला लूटले आहे. तसेच त्यांनी आसनापूलाजवळचे परीसरात भरपूर लोकांना लूटले आहे, मोहमद आसीम हा पिव्हीआर नांदेड येथे व राहूल कूरील हा बालाघाट ता. अहमदपुर जि. लातूर येथील शूगर फॅक्ट्रीमध्ये भंगारच्या कामाला आहे अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने सदर आरोपीतांचा शोध घेण्यासाठी श्री सूनिल निकाळजे पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांनी सपोनि पी. डी. भारती व स्टाफ यांना सदर आरोपींना पकडण्यासाठी सूचना देऊन रवाना केले. सदर आरोपींचा सदर पथकाने शोध घेतला असता आरोपी नामे सैय्यद आसीम हा पिव्हीआर नांदेड येथे आरोपी नामे राहूल कूरील हा बालाघाट शूगर फॅक्ट्री अहमदपूर येथे मिळून आला असून, त्यांना स्थानिक गून्हे शाखा नांदेड येथे आणून, त्यांच्याकडे सदर गून्हयांबाबत विचारपूस केली असता, त्यांनी सदर गून्हा केला असल्याचे सांगितले. त्यांचेकडून चोरीचे दोन मोबाईल हॅंडसेट व त्यांनी गून्हयात वापरलेली स्पेलंडर मोटार सायकल असा एकूण ६८००० रूपयाचा मूददेमाल जप्त करण्यात आला आहे. त्यांचा आणखी एक साथीदार आरोपी फरार आहे. सदर आरोपींना पूढील कायदेशीर कार्यवाहीस्तव पो. स्टे. अर्धापूर यांच्या ताब्यात दिले आहे. सदर आरोपी आसना नदीच्या परीसरात अंधारात थांबून सावज शोधायचे व मोटार सायकल स्वारांना अंधारात आडवून लूटायचे. सदर आरोपीतांकडून आणखी गून्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री संजय जाधव, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री डॉ. अक्षय शिंदे, मा. अभिजित फस्के उपविपोअ नांदेड शहर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री सूनिल निकाळजे पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड, स. पो. नि. पी. डी. भारती, पोहेकॉ/१०७० कुलकर्णी, पोना/१२१० अफजल पठाण, पोना/७२१ शेख जावेद, पोना/१३४९ ब्रम्हानंद लामतूरे, पोकॉ/२७४४ शैलेश बूडगलवार, पोकॉ/१४८ गंगुलवार, पोकॉ/टेकाळे, चालक पोकॉ/३०८१ शेख कलीम यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे मा. पोलीस अधीक्षक नांदेड, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतूक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४